# Government College Of Education, Panvel.

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

## आंतरवासिता गट अहवाल.

बी.एड. वर्ग :-२०२३-२५.

द्वितीय वर्ष.

सत्र 3.

आंतरवासिता कालावधी :- दि. २९ ऑगस्ट २०२४ ते ०७ डिसेंबर २०२४.

शाळेचे नाव : चांगू काना ठाकूर विद्यालय, नवीन पनवेल.

गट मार्गदर्शक.

प्रा. बिजली दडपे

Edit with WPS Office

Edit with WPS Office

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## द्वितीय वर्ष, तृतीय सत्र

## २०२४-२५

## आंतरवासिता गट क्रमांक: ०१

## चांगू काना ठाकूर विद्यालय, नवीन पनवेल

## मार्गदर्शक: प्रा. बिजली दडपे

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल यांच्या बी.एड व्दितीय वर्षातील तृतीय सत्राच्या आंतरवासिता गट क्रमांक: ०१ या गटाचा द्वितीय आंतरवासिता उपक्रम चांगू काना ठाकूर विद्यालय,पनवेल येथे पार पडला. मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रम निकषानुसार २९ ऑगस्ट २०२४ ते ०७ डिसेंबर २०२४ या कालावधीत ११ आठवड्यांचा आंतरवासिता कार्यकाळ पूर्ण करण्यात आला. या कार्यकाळात प्रा. बिजली दडपे यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरवासिता गट क्रमांक: ०१ मध्ये एकूण ६ छात्राध्यापकांचा समावेश होता.

**आंतरवासिता गट क्रमांक: ०१ मधील छात्राध्यापकांची नावे खालील प्रमाणे;**

| क्र. | हजेरी क्रमांक | छात्राध्यापकाचे नाव | विषय |
|---|---|---|---|
| १ | १४ | अविनाश कृष्णाराव काठवटे | विज्ञान |
| २ | १५ | नितेश संतू कोरडा | मराठी |
| ३ | २१ | सिद्धी विलास मुसळे | भूगोल |
| ४ | २२ | सुवर्णा काकड्या नम | इंग्रजी |
| ५ | २६ | हर्षला संजय पाटील | इंग्रजी |
| ६ | २७ | स्नेहलता राजेंद्र पाटील | विज्ञान |

Edit with WPS Office

## आंतरवासितेची उद्दिष्टे

१) अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील पायाभूत तसेच उच्चतम कौशल्य विकसित करण्यासाठी १० सराव पाठ घेणे.

२) अनुभवी शिक्षकांसोबत चर्चा करून त्यांच्या अनुभवांचा उपयोग करून घेण्यासाठी त्यांच्यासोबत सहकार्यात्मक पाठ घेणे.

३) पर्यावरण आणि जीवन कौशल्य यांना अनुसरून ती जीवनमूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी विषयकेंद्रित पाठ घेणे.

४) चार सलग पाठ घेऊन संविधान सारणीच्या आधारे प्रश्नपत्रिका तयार करून मूल्यांकनाच्या दृष्टीने घटक चाचणीचे आयोजन करणे.

५) विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक आणि शैक्षणिक समस्या निराकरणासाठी मार्गदर्शन आणि समुपदेशनाद्वारे त्यांना सक्षम बनवणे.

६) रिक्त तासिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर विषयांवर चर्चा करणे.

७) अभ्यासपूरक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांसोबत समन्वय साधण्याकरिता आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सहशालेय उपक्रमांचे आयोजन करणे.

८) छात्रसेवाकाळात वेळोवेळी प्रत्येक छात्रध्यापकांच्या कार्याच्या विभागांचा आढावा घेण्यासाठी व उणिवांवर सुधारणा सुचवण्यासाठी तसेच आगामी कार्यकाळाचे नियोजन करण्याकरिता वेळोवळी सहविचार सभा आयोजित करणे.

९) परीक्षांती पालक सभेचे आयोजन करून विद्यार्थ्यांची प्रगती तसेच समस्या जाणून घेण्यासाठी पालकांशी चर्चा करणे व समुपदेशन करणे.

१०) मुंबई विद्यापीठाच्या DLLE विभागांतर्गत COMUNITY WORK साठी नेमून दिलेल्या विविध सामाजिक विषयांवर ०७ पाठ घेणे.

Edit with WPS Office

**प्रमुख**

शालेय रचनेनुसार प्रशिक्षणार्थी यांना विविध पदे व जबाबदाऱ्या देण्यात आल्या. मार्गदर्शक प्रा. बिजली दडपे यांच्या मार्गदर्शनाने आंतरवासितेतील निकषानुसार खालील प्रशिक्षणार्थी यांना जबाबदारी व पदे देण्यात आली.

| ह क्र | प्रशिक्षणार्थींचे नाव | प्रमुखपद |
|---|---|---|
| १५ | नितेश संतू कोरडा | मुख्याध्यापक |
| २७ | स्नेहलता राजेंद्र पाटील | उपमुख्याध्यापक |
| २६ | हर्षला संजय पाटील | वेळापत्रक प्रमुख |
| २२ | सुवर्णा काकड्या नम | हजेरी प्रमुख |
| २१ | सिद्धी विलास मुसळे | खजिनदार |
| १४ | अविनाश कृष्णाराव काठवटे | आयसीटी प्रमुख |

Edit with WPS Office

❖ **आंतरवासिता उपक्रमातील महत्वाच्या कृती.**

## १) सराव पाठ

मुंबई विद्यापीठाच्या बीएड अभ्यासक्रमानुसार तृतीय सत्रातील आंतरवासिता कार्यकाळात अध्यापन कौशल्य विकसित करण्यासाठी १० सराव पाठ घ्यायचे होते. गट मार्गदर्शक प्रा. बिजली दडपे यांच्याकडून पाठाची टाचणे तपासून घेतली व त्यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २९/८/२०२४ ते २३/११/२०२४ या कालावधीत सर्व छात्राध्यापकांनी मिळून एकूण ६० सराव पाठ पूर्ण केले.

## २) विषयाधिष्ठित पाठ

आंतरवासिता उपक्रमामध्ये प्रत्येक शिक्षक प्रशिक्षणार्थ्याला अध्यापन कौशल्य विकसित होण्यासाठी दोन विषयाधिष्ठित घ्यायचे होते. या दोन विषयांपैकी एक पाठ पर्यावरण आणि दुसरा पाठ जीवन कौशल्य या विषयाशी संबंधित होता. दिनांक २१/१०/२०२४ ते दिनांक २८/११/२०२४ या कालावधीमध्ये हे पाठ सर्वांनी यशस्वीपणे पूर्ण केले. या पाठांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जागृतीही केली. तसेच जीवन कौशल्यांवर आधारित पाठाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये मूल्य संस्कार रुजवण्याचा प्रयत्न केला. या जीवन कौशल्याच्या पाठांवर आधारित विशेषांक तयार करून त्याचे प्रकाशन करण्यात आले.

## ३) वेळापत्रक

आंतरवासिता काळात नियोजनबद्ध कार्यक्रम, व्यवस्थापन आणि गटात समन्वय साधण्यासाठीची सर्वांत महत्त्वाची आणि जबाबदारीची बाब म्हणजे वेळापत्रक. गटामध्ये एका वेळापत्रकप्रमुखाची निवड करण्यात आली. शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांचे यशस्वी आयोजन हे यामागील प्रमुख उद्दिष्ट होते. वेळापत्रकाचे अचूक पालन सुनिश्चित करून तसेच कोणत्याही अनपेक्षित अडचणींची सोडवणूक कशी करावी, हे वेळापत्रकाच्या नियोजनातून आम्हांला समजले. वेळापत्रकामुळे विद्यार्थ्यांना अध्ययन प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी उत्तम नियोजन, सर्व शैक्षणिक व सहशालेय कार्यक्रम वेळेवर आयोजित करून आमच्या गटाने ते यशस्वीपणे पूर्ण केले. वेळापत्रकामध्ये दैनंदिन नियोजन केले गेले. सराव पाठ, अनुभवी सहशिक्षकांसमवेत पाठ, रिक्त तासिका, घटक चाचणी, सहविचार सभा, समुपदेशनाचे तास, हे सर्व कार्य आम्ही नियोजित वेळापत्रकानुसार वेळेत पूर्ण केले. काही वेळा अचानक वेळापत्रकामध्ये बदल करावयाचा झाल्यास निर्णयक्षमता व प्रभावी संवाद यांचा उपयोग करून परिस्थिती कशी हाताळावी, हे आम्हांला समजले.

## ४) अनुभवी शिक्षकांसमवेत सहअध्यापन (Co Teaching Lesson)

शालेय शिक्षकांच्या अनुभवाचा आणि तंत्राचा वापर करण्यासाठी शाळेतील अनुभवी शिक्षकांसोबत प्रत्येकी ३ पाठ घेणे आवश्यक होते. आणि हे एकूण १८ पाठ दि. ११ नोव्हेंबर २०२४ ते १६ नोव्हेंबर २०२४ या काळात यशस्वीपणे पूर्ण केले. त्यासाठी शाळेतील सर्व विषय शिक्षकांनी आम्हांला मार्गदर्शन आणि सहकार्य केले. आंतरवासिता काळात सहशिक्षक म्हणून काम करतांना अध्यापन कौशल्यांचा विकास, विद्यार्थ्यांशी संवाद, शिस्तबद्धता आणि शैक्षणिक उद्दिष्टांच्या पूर्ततेवर भर देण्यात आला. त्यामधून अध्यापन तंत्राचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी आम्हांला मिळाली. अनुभवी सहशिक्षकांसमवेत पाठ घेतांना विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याचे कौशल्य विकसित करता आले. विविध अध्यापन तंत्रांचा वापर करून विद्यार्थ्यांसमोर संकल्पना कशा पद्धतीने स्पष्ट कराव्यात, हे आम्हांला अनुभवी सहशिक्षकांसमवेत पाठ घेतांना अनुभवायला मिळाले.

Edit with WPS Office

## ५) घटक चाचणी

आंतरवासिता उपक्रमांमध्ये अध्ययन-अध्यापनाबरोबरच मूल्यमापन प्रक्रियेचा छात्रध्यापकांना अनुभव यावा, यासाठी घटक चाचणीचे आयोजन करण्याची जबाबदारी आमच्यावर होती. त्याकरिता अध्ययन अध्यापनामध्ये नेमून दिलेल्या वेळेत घटक चाचणीचे नियोजन करून आंतरवासितेच्या पाचव्या आठवड्यात चार सलग पाठ घेऊन संविधान सारणीच्या आधारे प्रश्नपत्रिका तयार करून, मूल्यांकनाच्या दृष्टीने घटक चाचणी घेण्यात आली. तसेच उत्तरसूची, गुणदान योजना अशा विविध संख्याशास्त्रीय तंत्रांचा वापर करून प्रत्यक्ष परीक्षा घेण्याचा अनुभव घेतला.

## ६) आंतरवासिता सहशालेय उपक्रम

१) महात्मा गांधी जयंती आणि लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त इंग्रजी कथाकथन स्पर्धा

दि. १ ऑक्टोबर २०२४ रोजी चांगू काना ठाकूर विद्यालय, पनवेल येथे महात्मा गांधी जयंती आणि लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त इंग्रजी कथाकथन स्पर्धा आयोजित करण्यात आली. ही स्पर्धा इयत्ता ५वी ते ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी होती. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी चांगल्याप्रकारे आपला सहभाग नोंदवला. गटातील सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी फलकलेखन, वर्गसजावट आणि छायाचित्रण अशा विविध कामांमध्ये आपला सहभाग नोंदवला आणि कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी सहकार्य केले.

२) सत्र परीक्षेचे पर्यवेक्षण

दि. १८/१०/२०२४ ते २८/१०/२०२४ या कालावधीत इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांची प्रथम सत्रांत परीक्षा घेण्यात आली. शाळेतील पर्यवेक्षकांच्या परवानगीने गटातील सर्व प्रशिक्षणार्थ्यांना मर्यादित वेळेसाठी वेगवेगळ्या वर्गांवर पर्यवेक्षकाच्या भूमिकेत पाठविण्यात आले. या माध्यमातून सर्व छात्राध्यापकांना पर्यवेक्षण करण्याचा अनुभव मिळाला.

३) दैनंदिन परिपाठ

दि. २/१२/२०२४ रोजी गटातील सर्व छात्राध्यापकांनी दैनंदिन शालेय परिपाठ घेतला. परिपाठाच्या क्रमानुसार राष्ट्रगीत, राज्यगीत, प्रार्थना, प्रतिज्ञा, मनाचे श्लोक इत्यादी बाबी घेण्यात आल्या. सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी सुरेल आवाजात परिपाठ सादर केला.

## ७) रिक्त तासिका आणि DLLE तासिका

रजेवर असणाऱ्या शिक्षकांच्या जागी जाऊन बुलेटिन अर्थातच रिक्त तासिका सांभाळण्याचे कार्यही आमच्या गटाने पूर्ण केले. ज्यात विविध गोष्टी, गाणी, मागे राहिलेला अभ्यासक्रम या गोष्टी पार पाडण्यात आल्या. या रिक्त तासिकांची संख्या सुमारे १०००हून अधिक होती. तसेच मुंबई विद्यापीठाच्या DLLE विभागाअंतर्गत Comunity Work साठी नेमून दिलेल्या विविध सामाजिक विषयांवरील प्रत्येकी ७ तासिकाही गटाने रिक्त तासिकांमध्येच यशस्वीपणे पूर्ण केल्या.

Edit with WPS Office

## ८) सहविचार सभा

आंतरवासितेच्या सर्व आठवड्यात दैनंदिन अभिप्राय घेत पुढील नियोजन करण्यासाठी सहविचार सभा घेण्यात आल्या. दैनंदिन नियोजन, वेळापत्रकामधील काही बदल, साप्ताहिक नियोजन, सहशालेय उपक्रम, पाठ टाचण संदर्भातील सूचना, सहशिक्षक पाठ, घटक चाचणी नियोजन व इतर काही उपक्रमांसंदर्भातील सूचनांची आदान-प्रदान करण्यासाठी वेळोवेळी सहविचार सभा घेण्यात आल्या. तसेच गटातील मुख्याध्यापकांनी योग्य वेळी सर्वांच्या समस्या लक्षात घेऊन त्यांचे निरसण केले व नियोजनाप्रमाणे सर्व काम योग्य वेळेत झाले की नाही, याची पडताळणी केली. मार्गदर्शकांनी नाविन्यपूर्ण उपक्रमांबाबतीत चर्चा करून छात्राध्यापकांकडून उपक्रम राबवून घेतले. या सर्व सभा गट मार्गदर्शक प्रा. बिजली दडपे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या.

## संयुक्त सहविचार सभा आणि सांगता समारोह

दि. ०४ डिसेंबर २०२४ रोजी चांगू काना ठाकूर विद्यालय, पनवेल येथे शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथील आंतरवासिता गट क्रमांक: ०१च्या संयुक्त सहविचार सभेचा आणि आंतरवासिता सांगता समारोह पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानीं शाळेचे मुख्याध्यापक श्री. कैलास सत्रे हे होते, तर मार्गदर्शक म्हणून प्राध्यापक बिजली दडपे यांनी स्थान भूषविले. या संयुक्त सहविचार सभेत शाळेतील सांस्कृतिक विभागाच्या श्रीमती अर्चना पाटील यांनी आंतरवासिता गटातील सर्व छात्राध्यापकांच्या संपूर्ण ११ आठवड्यांतील कारकिर्दीचे कौतुक केले. त्याचबरोबर शारीरिक शिक्षण विभागाचे श्री. शिंदे सर यांनीही गटातील छात्राध्यापकांबद्दल गौरवोद्गार काढले. वेगवेगळ्या इयत्तांच्या विद्यार्थ्यांनी गटातील छात्राध्यापकांबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. आंतरवासिता कार्यकाळादरम्यान रिक्त तासिकांमध्ये घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थी आणि शिक्षक यांमधील दृढ झालेल्या नात्यावर विद्यार्थ्यांनी विशेष भर दिला. गटातील छात्राध्यापक श्री. अविनाश काठवटे यांनीही आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर गटाच्या मार्गदर्शिका प्रा. बिजली दडपे यांनी विद्यार्थ्यांना भविष्यासाठी शुभ संदेश दिला. सदर समारोहाचे सूत्रसंचालन गटातील छात्राध्यापक सिद्धी मुसळे यांनी केले, तर प्रास्ताविक गटाचे मुख्याध्यापक श्री. नितेश कोरडा यांनी सादर केले. गटाच्या उपमुख्याध्यापिका श्रीमती स्नेहलता पाटील यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले व चहापानाने या समारोहाची सांगता करण्यात आली.

Edit with WPS Office

**या आंतरवासितेतून छात्राध्यापक काय शिकले...?**

शिक्षकांची मूलभूत कर्तव्ये आणि जबाबदारी समजून घेण्यास मदत झाली.

रिक्त तासिकांदरम्यान वर्ग नियंत्रण, नाविन्यता यांचा विकास करण्यात आला. त्याचबरोबर विविध विषयांतर्गत घेण्यात आलेल्या तासिकांमधून विद्यार्थ्यांसमोर उभे राहून शिकवण्याचा आत्मविश्वास वृद्धिंगच होण्यास मदत झाली.

हजेरी, वेळापत्रक, वस्तू निर्लेखन, विविध आराखडे इत्यादी बाबींची नोंद कशी करावी, हे लक्षात घेता आले.

सहशालेय उपक्रमांचे आयोजन व नियोजन करण्याचे प्रत्यक्ष अनुभव घेता आले.

अनुभवी तसेच तज्ञ शिक्षकांसोबत पाठ घेऊन त्यांच्याकडून अध्यापनाची विविध उपयुक्त तंत्रे शिकण्यास मिळाली.

संविधान सारणीच्या आधारे प्रत्यक्ष घटक चाचणीचे आयोजन करून, त्यामागील सांख्यिकी विश्लेषणाची संपूर्ण पार्श्वभूमी लक्षात घेता आली.

विषयाधिष्ठित पाठांच्या माध्यमातून सर्वंकष ज्ञान आणि सामाजिक विषयावर भाष्य करत, जीवन कौशल्ये आणि मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी प्रयत्न करता आले.

दैनंदिन परिपाठ, कथाकथन स्पर्धा आणि पर्यवेक्षण यांसारख्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून नियोजन आणि आयोजनाचे कौशल्य दृढ करता आले.

एकूणच शालेय व्यवस्थापन आणि विद्यार्थी यांसाठी उपयुक्त उपक्रम राबवण्याची प्रेरणा मिळाली.

Edit with WPS Office